महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/ प.रा.-३/२१ दिनांक :- २३ मार्च, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- सहायक आयुक्त (विभाग अधिकारी), बृहन्मुंबई महानगर पालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ, चाळणी परीक्षा-२०२१

संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०४/२०२१, दिनांक २४ जून, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त (विभाग अधिकारी), बृहन्मुंबई महानगर पालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ, या पदाची चाळणी परीक्षा दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी घेण्यात आली आहे. सदर चाळणी परीक्षेमधून छाननीकरीता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचा निकाल दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर निकालात समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या प्रोफाईलद्वारे केलेल्या अर्जातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने पात्रता तपासण्याकरीता खाली नमूद प्रमाणपत्रे / कागदपत्रे (लागू असलेली) विहित कालमर्यादेत अपलोड करणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | प्रमाणपत्रे / कागदपत्रे | फाईल फॉमर्ट | किमान फाईल साईज (KB) | कमाल फाईल साईज (KB) |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता | PDF | ५० | ५०० |
| २ | वयाचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा- जाहिरातीतील मुद्दा क्र. ३.३ मध्ये नमूद केलेली सर्व प्रमाणपत्रे | PDF | ५० | ५०० |
| ४ | अनुभवाचा पुरावा / प्रमाणपत्र जाहिरातीमधील मुद्दा क्र. ३.४ मध्ये नमूद केल्यानुसार | PDF | ५० | ५०० |
| ५ | सामाजिकदृष्टया मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ७ | अद्ययावत नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १० | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याबाबतचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| ११ | खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १२ | अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |
| १३ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १४ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा | PDF | ५० | ५०० |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | PDF | ५० | ५०० |
| १६ | बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या असलेल्या उमेदवारांकरीता वयोमर्यादेतील सवलतीचे पुरावे/ प्रमाणपत्र | PDF | ५० | ५०० |

२. उपरोक्त प्रमाणपत्रे/ कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' (General Instructions) मधील प्रकरण क्रमांक चारमध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

३. अद्ययावत नॉन - क्रिमिलेअर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. 'लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र' व 'अनुभवाचा पुरावा' म्हणून सादर करावयाचा नमुना आयोगाच्या संकेतस्थळावर 'DOWNLOADS' या सदरामधून उपलब्ध करुन घेण्यात यावा व त्यानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही नमुन्यात सादर केलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

५. अनुभवाबाबत 'Have administrative, executive or supervisory experience in responsible capacity for not less than five years in Government, Semi-Government or any big Industrial or Commercial concern जबाबदार पदावरील 'Administrative experience or executive' अशा स्वरुपाचा अनुभव धारण करीत असल्याबाबतचा सुस्पष्ट उल्लेख प्रमाणपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. The experience of ex-armed force officers will be considered as supervisory experience for the duration they served in armed forces as Commission officers.

६. जबाबदारीच्या पदावर म्हणजे शासनामधील किंवा सरकारी क्षेत्रातील संस्था किंवा परिसंस्था यामधील वेतन बँड M-२३ रुपये ४१,८००-१,३२,३०० किंवा त्या पेक्षा जास्त वेतन बँड व ग्रेड पे मधील राजपत्रित पद असा घेण्यात यावा तसेच यामध्ये सदर वेतन बँड व ग्रेड पे मधील पदाशी समकक्षता सुनिश्चित करता येईल. अशा अन्य क्षेत्रातील पदे देखील विचारात घेता येईल. अशा अन्य क्षेत्रातील अनुभव धारण करीत असल्यास त्या पदावरील अनुभव सुस्पष्टपणे प्रमाणपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. खाजगी संस्थेत कार्यरत असल्यास जबाबदारीचे पद म्हणजे उच्च श्रेणीतील वरिष्ठ व्यवस्थापकीय पदावरील अनुभव धारण करीत असल्यास त्या पदावरील अनुभव नमूद केलेल प्रमाणपत्र मोठ्या औद्योगिक संस्थेमध्ये कार्यरत असल्यास अशी शासकीय / खाजगी संस्था जेथे १००० पेक्षा अधिक सेवकवर्ग कार्यरत आहेत. त्याकरिता अशा संस्थेतील सदर बाबीचा स्पष्ट उल्लेख अनुभव प्रमाणपत्रात असणे आवश्यक आहे.

७. जाहिरातीनुसार अर्ज करतांना केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने (लागू असलेली) कागदपत्रे/ प्रमाणपत्रे PDF करुन विहित आकारमानामध्ये आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' अंतर्गत 'Upload Documents' या मेनूमध्ये दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत अपलोड करणे अनिवार्य राहिल. सदर प्रमाणपत्रे विहित कालावधीत अपलोड न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत पदाच्या निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- मुंबई

उपसचिव (राजपत्रित परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग